**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com

शिशुस/शिक्षण शुल्क निश्चिती/२०२२-२३/२०२२/४०३ दि.१४-१२-२०२२

प्रति,
प्राचार्य,
राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अल्पसंख्यांक महाविद्यालये

**विषय:- समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या बाबतीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५-११-२०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, शिक्षण शुल्क समितीच्या दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील निर्णयानूसार राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या सन २०२१-२२ करिता महाडीबीटी पोर्टलवर शुल्क मंजूरीबाबत झालेला निर्णय महाविद्यालयांना कळविण्यात आला होता. या निर्णयाच्या अनुषंगाने

**अ.** ज्या अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी अंतिम मंजूर शुल्कात २० टक्केपेक्षा कमी वाढ केली, अशा महाविद्यालयांच्या शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात आली. यापैकी ज्या महाविद्यालयांनी सन २०२१-२२ करिता अंतिम मंजूर शुल्कच वाढ न करता महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून घेतले, अशा महाविद्यालयांनी सन २०२२-२३ करिता नव्याने प्रस्ताव/अभिलेख (उदा. लेखा परिक्षण अहवाल, एन.सी.टी.ई. ची मंजूर प्रवेश क्षमता, यापूर्वी मंजूर केलेले शुल्क व computation Form, Depreciation form,पी.एच.डी.प्रमाणपत्र, नॅक प्रमाणपत्र इ.अभिलेख अध्यक्ष व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने व सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले) सादर करून समितीकडून शुल्क पडताळणी करून घ्यावी, असा निर्णय समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत झालेला आहे.

**ब.** तसेच २० टक्केपेक्षा जास्त वाढ केलेल्या महाविद्यालयांकडून लेखापरिक्षण अहवाल, विद्यार्थी संख्या इ.अभिलेख मागवून समितीच्या खर्च लेखापालांमार्फत पडताळणी करून आलेल्या शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात आलेली आहे. उपरोक्त अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात आलेल्या शुल्कास समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मुद्दा **अ** (अंतिम मंजूर शुल्कात वाढ न केलेली महाविद्यालये वगळता)आणि **ब** मधील महाविद्यालयांचे महाडीबीटी पोर्टलवर मंजूर केलेले शुल्कच विद्यार्थ्यांकडून आकारणी करण्यात

येईल,असे प्रतिज्ञापत्र संस्थेने/प्राचार्यांनी या कार्यालयास दि.१५.०१.२०२३ पर्यंत सादर करावे, जी महाविद्यालये असे प्रतिज्ञापत्र सादर करणार नाहीत, अशा महाविद्यालयांची नावे समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना कळवून त्यांचे प्रवेश थांबविणेबाबत विनंती करण्यात येईल.

**(हरिविजय शिंदे)**
**सहसंचालक,**
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

**१.मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२**
**२.मा. सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**